# **विकासाचे गाणे**

दिवस उद्याचा, मित्रच माझा

कोण जाणे कसा उगवणार ?

कडक ऊन की कडकड पाऊस

काय होईल, कोण ठरवणार ? ।।धृ।।

सारे लिहिले शरीरामध्ये

पेशीआतल्या जनुकांनी

ठरलेली ती भाषा त्यांची

शरीर माझे ते गिरवणार ।।१।। . . .. . Nature

जनुकांना आकार देतसे

संस्कारांची ही फुलबाग

गुणसंपत्ती हेच गुप्तधन

जीवनभर मी मिरवणार ।।२।।. . .. . Nature

बीज असू दे सच्च्चेखासे

अन् मातीची ऊब अपार

पाऊस, वारा आणि उष्णता

हे भाग्याला फिरवणार ।।३।।. . .. . Nature

दिसे जरी मी सर्वसमान

खुबी माझीही खास असे

अस्तित्वाची छबी आगळी

मीच शेवटी ठरवणार ।।४।। . . .. . Unique